
# आरोग्य साथी

## भाग २




डॉ. अनंत फडके

डॉ. अभय शुक्ला

साथी केंद्र, सेहत

# आरोग्य साथी

**भाग - २**

**(दुसरी आवृत्ती)**

**डॉ. अनंत फडके** **डॉ. अभय शुक्ला**

**सहलेखन - डॉ. निलांगी नानल**

**संपादन सहायय् - डॉ. अमिता पित्रे, डॉ. समीर मोने**

## साथी केंद्र, सेहत

**चित्रांकन :** श्री. चंद्रशेखर जोशी

**प्रकाशक :** साथी केंद्र, सेहत, अमन टेरेस,प्लॉट नं. १४०,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०२९
**फोन :** (०२०) २५४५१४१३, २५४५२३२५
e-mail : cehatpun@.vsnl.com

**पहिली आवृत्ती :** एप्रिल २०००

**दुसरी आवृत्ती :** १ डिसेंबर ०४

**देणगी मूल्य :** रु. १२०/-

**मुद्रक :** बालोद्यान मुद्रणालय, पुणे ३०

# आरोग्य जागृतीसाठी 'सेहत'ची प्रकाशने

| क्र. | प्रकाशनाचे नाव | देणगी मूल्य |
|---|---|---|

## १. चित्रमय पोस्टर्स (१५''x १७'') (संपूर्ण सेट रु.१३)

- सलाईन म्हणजे मिठाचे पाणी! (दोन रंगी) — २.५० रु.
- जर गोळी देई आराम, नको सुईचे जास्त दाम — १.५० रु.
- आपल्या गावात आपल्यासाठी आरोग्य सेवा — १.५० रु.
- आरोग्य सेवा-आमचा अधिकार — १.५० रु.
- आपल्या आरोग्यासाठी आपण हे करूया! — १.५० रु.
- खाजगी आरोग्य सेवेशी संवाद करूया! — १.५० रु.

(वरील पोस्टर्स हिंदीमध्येही उपलब्ध आहेत)

- स्त्री संवेदनशील समाज हवा — १.५० रु.
- स्त्री संवेदनशील आरोग्य सेवा हवी — १.५० रु.

## २. प्रशिक्षणासाठी पुस्तके

- आरोग्य साथी भाग १ व २ (तीन रंगी, ८'' x १०'', प्रत्येकी ९६ पाने) — प्रत्येकी ७५ रु.
  (हिंदीमध्येही उपलब्ध)
- करु आरोग्याची साथ! भाग १ व २ (तीन रंगी) — प्रत्येकी १२० रु.
- कवाडे उघडू या! (दोन रंगी, ६८ पाने) — २० रु.

## ३. पुस्तके

- जन आरोग्य सनद (पाने २४) — ५ रु.
- आरोग्य संवाद कसा साधावा?(झेरॉक्स प्रत/पाने १६) — ३ रु.
- जन आरोग्य अभियान (पाने ३२) — ५ रु.
- चळवळ आरोग्याची, जनवादी पर्यायाची(पाने ३६) — २५ रु.
- आमच्या शरीरावर आमचा हक्क (पाने ६४) — २५ रु.
- एम.टी.पी. केंद्र नोंदणीकरण:मार्गदर्शिका (पाने ५३) — २५ रु.
- डॉक्टरांवर नियंत्रण.....! (पाने ६४) — १० रु.
- स्वास्थ्य के लिए विकल्प व संघर्ष (पाने ४४) — १५ रु.

| क्र. | प्रकाशनाचे नाव | देणगी मूल्य |
|---|---|---|

## ४. स्लाईड शो

- रक्तपांढरी (१८ स्लाईड्स) — ३६० रु.
- आरोग्य सेवा - आमचा अधिकार (१८ स्लाईड्स) — ३६० रु.
- एड्स (संकल्पना व मांडणी-प्रयास) (७६ स्लाईड्स) — १६०० रु.
- कथा गर्भपाताची - व्यथा स्त्रीची (५२ स्लाईड्स) — १०५० रु.
- दारुचे दुष्परिणाम (१८ स्लाईडस्) — ३६० रु.

## ५. ZÉÊ®ÉC° É{ÉÊ] ®ÉÚ|ÉnÉ¶ÉÇEòÉ (१५ x१७ )

- दारुचे दुष्परिणाम (१० पोस्टर्स) — ७२ रु.
- आरोग्य सेवा, आमचा अधिकार (७ पोस्टर्स) — ४२ रु.
- आपल्याला कशी आरोग्य सेवा हवी? (७ पोस्टर्स) — ४२ रु.
- आरोग्यदायी जीवनासाठी (६ पोस्टर्स) — ३६ रु.
- आपल्याला हे माहीत हवे (१४ पोस्टर्स) — ८४ रु.

## ६. 'घरातील हिंसा' याबाबत जागृतीसाठी हिंदी पोस्टर्स

- मेरी माँ सो रही है। — ५ रु.
- सहनशीलता का घुंगट हटाओ... — ५ रु.
- जुल्म सहकर चुप रहती हो क्युँ? — ५ रु.
- मेरे माता, पिता... — ५ रु.
- मत डरो, मत सहो, जुल्म इतना... — ५ रु.



# या पुस्तकाबद्दल थोडेसे....

'आरोग्य साथी भाग-२' या पुस्तकाची दुसरी आवृत्ती तुम्हा आरोग्य साथीच्या हातात ठेवतांना आम्हाला खूप आनंद होत आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागाच्या सुरवातीला या पुस्तिकेचा उद्देश, पुस्तकाच वैशिष्ट्ये, पुस्तकाची रूपरेषा हे थोडक्यात मांडले होते. दुसऱ्या भागाचा वार करायच्य क्राआधी पुन्हा हे मुद्दे तुम्ही वाचावेत म्हणून ते परत खाली देत आहोत.

आपल्याला सर्वांना माहित आहे की एकविसावे शतक उजाडू लागले तरी अजूनही भारतातील खेडया-पाड्यांमध्ये योग्य आरोग्य-सेवा मिळत नाही. ती मिळायची असेल तर सध्याच्या परिस्थितीत किमान एवढे तरी झाले पाहिजे की त्या त्या गावात राहणा-या सुयोग्य व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांच्या मार्फत कायम गावातच उपलब्ध असणारी प्राथमिक आरोग्य-सेवा देणे. खरं तर अनेक साध्या आजारांचे निदान ,उपचार करायला डॉक्टरची गरज नसते. गेल्या सुमारे पंचवीस वर्षात जगात ठिकठिकाणी व भारतातही झालेल्या प्रयोगांवरूनही हे स्पष्ट झाले आहे. सरकारी क्षेत्रातही ग्रामीण आरोग्य रक्षक ही योजना मोठ्या प्रमाणावर राबवली गेली. चुकीच्या अंमलबजावणीमुळे ही सरकारी योजना अयशस्वी ठरली असली तरी बिन-सरकारी संस्थांमार्फत अनेक ठिकाणी ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांचे चांगले काम चालू आहे. मात्र कमी शिक्षण झालेल्या अशा आरोग्य कार्यकर्त्यांसाठी योग्य प्रशिक्षण - पुस्तके नाहीत. विशेषतः अर्ध-शिक्षित, अशिक्षित कार्यकर्त्यांसाठी जवळ जवळ काहीच साहित्य उपलब्ध नाही. या कार्यकर्त्यांपैकी अनेक स्त्रिया असतात व मागास, डोंगराळ भागात अशा कामासाठी अर्ध-शिक्षित, अशिक्षित स्त्रियाच पुढे येतात. मर्यादित पण योग्य प्रशिक्षण दिले तर प्राथमिक आरोग्य सेवेची अनेक कामे त्या चांगले करू शकतात असा अनेकांचा अनुभव आहे. अशा आरोग्य कार्यकर्त्यांसाठी हे प्रशिक्षण पुस्तक आहे. प्रशिक्षणात सांगितलेले मुद्दे नीट समजायला व लक्षात रहायला मदत व्हावी अशा बेताने हे चित्र-पुस्तक बनवले आहे. अर्थातच नुसते हे पुस्तक वाचून प्रशिक्षण होणार नाही. प्रशिक्षक व इतर सामुग्रीच्या मदतीने पध्दतशीर प्रशिक्षण त्यासाठी घ्यावे लागेल. या पुस्तकाचा उपयोग करणा-या प्रशिक्षकांसाठी स्वतंत्र पुस्तक बनवत आहोत. प्रस्तुत पुस्तकातील मांडणीमागील शास्त्रीय विचार, त्याचे तपशील प्रशिक्षकांसाठीच्या या स्वतंत्र पुस्तकात मिळतील.

ठाणे जिल्ह्यात डहाणू परिसरात कष्टकरी आदिवासींची चळवळ बांधणा-या कष्टकरी संघटनेतर्फे पुरस्कृत जन-आरोग्य समितीच्या स्त्री आरोग्य कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करण्यासाठी आम्ही या चित्र-पुस्तकाचा पहिला मसुदा बनवला. या आरोग्य कार्यकर्त्यांच्या व संघटनेतील इतर कार्यकर्त्यांच्या सूचना लक्षात घेऊन त्यात सुधारणा केल्या. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यात धरणग्रस्तांची चळवळ चालू आहे. या चळवळीच्या सहकार्याने जन-आरोग्य समिती, आजरा, यांच्यामार्फत स्त्री-आरोग्य-साथींच्या मदतीने असाच स्वावलंबी आरोग्य कार्यक्रम राबवला जात आहे. या आरोग्य साथींच्या प्रशिक्षणातही या मसुद्याचा वापर करून त्यात सुधारणा केल्या गेल्या.

हे पुस्तक बनवतांना तीन सूत्रे डोळयासमोर ठेवली आहेत. एक म्हणजे आरोग्य-साथींना आरोग्याचे काम करण्यासाठी आवश्यक अशाच संकल्पना व माहिती निवडून अनावश्यक माहितीचा बोजा टाळणे. दुसरे म्हणजे आवश्यक ती माहिती शास्त्रीय पध्दतीने पण सोप्यात सोप्या रितीने व चित्रांच्या माध्यमाने मांडणे. तिसरे म्हणजे आरोग्यासाठी चाललेली लढाई ही काही केवळ जंतुंविरूध्द चाललेली लढाई नाही. सामान्य जनतेचा आपल्या जीवनावर ताबा मिळवण्यासाठीच्या लढयातील तो एक भाग आहे. ही आमची भूमिका, शास्त्रीय माहितीच्या सोबत गुंफण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

निरनिराळया आरोग्य-प्रकल्पांमध्ये ग्रामीण आरोग्य कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम चालू असते. पण विषय तेच असूनही या प्रशिक्षणाचे प्रमाणीकरण झालेले नाही. त्या दिशेने एक पाऊल टाकावे या हेतूने या पुस्तकात प्रमाणभूत शास्त्रीय माहिती पाया म्हणून वापरली आहे. तसेच या क्षेत्रात काम करणा-या काही समविचारी डॉक्टर्सची मदत घेतली गेली आहे. त्यांना या पुस्तकाचा मसुदा पाठवून आणि दोन सविस्तर बैठकांमध्ये प्रत्येक पानावर तपशीलवार चर्चा होऊन मूळ मसुद्यात आशय व रूप या दोन्हीमध्ये ब-याच सुधारणा केल्या. या बैठकींमध्ये सामील झालेले डॉ. शाम अष्टेकर, डॉ. ध्रुव मांकड, डॉ. मोहन देशपांडे, डॉ. दीप्ती चिरमुले, डॉ. शशिकांत अधिकारी, डॉ. जगन्नाथ दिक्षित, डॉ. मिरा सदगोपाल, डॉ. ललिता डिसोझा, श्रीमती हेमा पिसाळ यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. 'आरोग्य साथी' तसेच 'साथी' प्रकल्पांमधील आमच्या सहकार्यांनी या प्रकल्पाच्या कामातील वेगवेगळया जबाबदा-या मनापासून सांभाळल्या.तसेच स्थानिक कामाची जबाबदारी मध्य प्रदेशात बड़वानी जिल्ह्यातील तसेच डहाणू-जव्हार व आज-यातील आरोग्य चळवळीतील कार्यकत्यांनी समर्थपणे सांभाळली म्हणून आम्हाला या पुस्तकाच्या कामाकडे पुरेसे लक्ष देता आले. या पहिल्या आवृत्तीसाठी डॉ. अमिता पित्रे यांनी अखेरच्या संपादकीय हात फिरवला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

चित्रकार श्री. चंद्रशेखर जोशी यांनी खास रस घेऊन सुबक चित्रे काढून दिली, आम्ही वेळोवेळी केलेले बदल आपुलकीने करून दिले याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. पहिल्या आवृत्तीसाठी सेहत ऑफिसमधील श्री. किरण मांडेकर व श्रीमती स्नेहा फुलंब्रीकर यांनी टायपिंग व इतर कामात तत्परतेने सहकार्य दिले, तसेच सेहत मधील इतर सहकार्यांनी वेळोवेळी संपूर्ण सहकार्य दिले. संगणकावर चित्रे रंगवून छपाईसाठी त्यांना अंतिम रूप देण्याचे कौशल्याचे काम श्री. आनंद पवार यांनी अगदी वेळेवर करून दिले. या सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. नोव्हिब (NOVIB) च्या अर्थसहाय्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार.

या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये अनेक लहानसहान सुधारणा केल्या आहेत व आठ पानेही वाढवली आहेत. ही दुसरी आवृत्ती बनवतांना आमचे सहकारी डॉ. समीर मोने यांची संपादनासाठी मोलाची मदत झाली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. दुसऱ्या आवृत्तीत कातडीचे व डोळ्यांचे आजार, प्रथमोचार, प्राथमिक आरोग्य सेवा हे तीन प्रकरणे डॉ. निलांगी नानल यांच्या मदतीने घातली आहेत. डॉ. निलांगी यांच्या या योगदानासाठी त्यांचे मनःपूर्वक आभार. दुसऱ्या आवृतीमध्ये तीन प्रकरणांसाठीचे संगणकावर चित्र रंगवणे व मजकुराची जुळणी करणे हे काम दत्तात्रय तरस, किरण मांडेकर, व श्रीमती शारदा महल्ले यांनी आत्मीयतेने केले व बालोद्यान मुद्रणालयाने वेळेवर छपाई करुन दिली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

आरोग्य व आरोग्य सेवेपासून वंचित ठेवले गेलेले ग्रामीण कष्टकरी व या वंचितपणा विरोधी लढयात सामील झालेले आरोग्य साथी यांना आम्ही हे पुस्तक अर्पण करतो.

आम्हाला विश्वास आहे की आपण या पुस्तकाचा पुरेपूर उपयोग कराल. तसेच या पुस्तकात सुधारणा करण्यासाठी आपल्या भागात, आपल्या परिस्थितीनुसार आपल्या सूचना आम्हाला पाठवाल.

डॉ. अनंत फडके डॉ. अभय शुक्ला

**साथी केंद्र प्रकल्प, सेहत**



# विषय सूची


| धडा | | विषय | पान |
|---|---|---|---|
| १. |  | जंतुंचे प्रकार | १ |
| २. |  | ताप | ६ |
| ३. |  | खोकला | ४४ |
| ४. |  | रक्तपांढरी | ६१ |
| ५. |  | पोटदुखी | ७१ |
| ६. |  | कातडी व डोळ्यांचे आजार | ८९ |
| ७. |  | प्रथमोपचार | १०० |
| ८. |  | प्राथमिक आरोग्य सेवा | १०९ |
| | | औषधांचा तक्ता | ११६ |

# सेहत बद्दल...

सेहत, [CEHAT ('Centre for Enquiry into Health and AlliedThemes')] हे अनुसंधान ट्रस्टचे संशोधन केंद्र आहे. आरोग्य विषयक लोकाभिमुख संशोधन व सामाजिक काम करण्यासाठी १९९१ साली अनुसंधान ट्रस्टची स्थापना झाली. १९९४ मध्ये सेहत मध्ये प्रत्यक्ष प्रकल्यांवर काम सुरू झाले. तेव्हा पासून सेहतने सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या खालील चार पैलुंवर तीस पेक्षा जास्त प्रकल्प हाती घेतले आहेत.

**१. आरोग्य सेवा व त्याचे अर्थकारण**

भारतातील सार्वजनिक व खाजगी आरोग्य सेवेची रचना काय आहे? आरोग्य सेवेच्या कोणत्या पैलूंवर कोणत्या राज्यात किती पैसे खर्च होतात यावर सेहत ने संशोधन केले, व भारतातील आरोग्य सेवा जगातील सर्वात जास्त खाजगीकरण झालेली सेवा आहे व सरकारी खर्चाचे प्रमाण आणखी घटले आहे याकडे लक्ष वेधले आहे. निव्वळ संशोधनावर समाधान न मानता आरोग्य क्षेत्रातील सत्ता संतुलन जनतेच्या बाजूने झुकावे यासाठीही सेहत प्रयत्नशील आहे. म्हणूनच जन-स्वास्थ्य अभियान या आरोग्य चळवळीसाठी उभारलेल्या राष्ट्रीय आघाडीत सेहत एक सक्रीय घटक म्हणून कार्यरत आहे.

('साथी केंद्रा'मार्फत केल्या जाणाऱ्या कामांची माहिती इतरत्र दिली आहे.)

**२. आरोग्य विषयक कायदे, नैतिकता, हक्क**

रूग्णांचे हितसंबंध राखण्यासाठी तसेच वैद्यकीय सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी कायदेशीर व इतर सुधारणा करण्याची गरज सेहतने आपल्या संशोधनातून पुढे आणली आहे. बॉंबे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट मध्ये खाजगी आरोग्य सेवेत सुधारणा करण्याचा प्रस्ताव आहे. डॉक्टर्स व रूग्ण यांच्या हितसंबंधात समतोल आणण्यासाठी सहमती घडवून आणून या प्रस्तावित कायद्यात ठोस सुधारणा सुचवण्याच्या कामात सेहत ने पुढाकार घेतला.
आरोग्य-क्षेत्रात संशोधन करताना जनतेचे विशेषतः रूग्णांचे हितसंबंध राखण्यासाठी संशोधकांनी पाळायची आचारसंहिता बनवून तिला देशव्यापी मान्यता मिळवण्याचे पथदर्शी काम सेहतने केले आहे.

**३. स्त्री-आरोग्य**

स्त्रियांचे आरोग्य हा विषय सुरूवातीपासून सेहतच्या कामाचा एक महत्वाचा भाग राहिला आहे. समाजात गर्भपाताचे प्रमाण किती आहे? गर्भपाताबद्दल ग्रामीण स्त्रियांना कोणत्या मानसिक, सामाजिक अडचणींना तोंड द्यावे लागते? गर्भपाताच्या सेवेचा दर्जा कसा आहे? खर्च किती येतो? गर्भपात विषयक कायदा पाळण्यात डॉक्टरांना येणाऱ्या अडचणी, अशा प्रश्नांवर सेहतने संशोधन करून या दुर्लक्षित प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे.

## ४. हिंसा व आरोग्य

कौटुंबिक हिंसाचार व त्याचा स्त्रियांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम हाही एक दुर्लक्षित प्रश्न. सेहतने या प्रश्नावर संशोधन करून त्याचे प्रमाण किती, त्याचे दुष्परिणाम कसे दिसतात हे पुढे आणले. तसेच अशा हिंसाचारामुळे झालेल्या स्त्रीला उपचार मानसिक आधार, सल्ला कसा द्यायचा याबद्दलचे एक मॉडेल मुंबई महानगरपालिकेच्या भाभा हॉस्पिटलच्या सहकार्याने उभारण्याचे पथदर्शी काम सेहतने दिलासा केंद्राद्वारे केले आहे. तसेच बलात्कारित स्त्रीला न्याय मिळण्यासाठी तिची नीट वैद्यकीय तपासणी व्हावी म्हणून एक तपासणी किटही तयार केला आहे.

स्त्री लिंगी गर्भापातासाठी गर्भाचे लिंग निदान करण्याच्या पद्धतीवर बंदी आणण्याऱ्या कायद्यात सुधारणा होऊन त्याची नीट अंमलबजावणी व्हावी यासाठी मासूम व साबू जॉर्ज यांच्या सोबत सेहतने सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावरील अनुकूल निकालामुळे या प्रश्नावर देशाचे लक्ष वेधले जाऊन या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत दबावही निर्माण झाला आहे.

पोलिस चौकीत होणारे छळ व मृत्यू याबाबतची डॉक्टरांची कर्तव्ये यावरही सेहतने संशोधन करून आवाज उठवण्याचे काम केले आहे.

संशोधन व सामाजिक उपक्रमांची संख्या, त्यांचे विषय व कामाचा दर्जा यामुळे सेहतने थोड्याच काळात भारतातील आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था म्हणून नाव प्रस्थापित केले आहे. सेहत आपल्या घोषित उद्दिष्टांनुसार काम करत आहे ना हे पाहण्यासाठी एक स्वतंत्र समिती स्थापन केली गेली असून सेहतची सर्व कागदपत्रे या समितीला उपलब्ध असतात. या समितीचा अहवाल प्रसिद्ध करण्याचे बंधन सेहतने स्वतःवर घातले आहे, पाळले आहे. हे बंधन व एकूणच लोकशाही निर्णय प्रक्रिया, पारदर्शकता व संशोधन प्रकल्पांमध्ये नैतिक तत्वे पाळण्याचा आग्रह यामुळेही सेहत नावारूपाला आली आहे.

**आमचा पत्ता**


**पुणे कार्यालय-**
फ्लॅट नं.३/४, अमन टेरेस,
फ्लॉट नं १४०, डहाणुकर कॉलनी,
कोथरुड, पुणे-४११०२९
फोन नं. (०९१) (२०) ५४५१४१३/५४५२३२५
**E-mail:cehatpun@vsnl.com**

**मुंबई कार्यालय-**
साई आश्रय, आराम सोसायटी रोड,
कोले कल्याण विलेज, वाकोला,
फोन नं. २६१४७७२७/२६१३२०२७
फॅक्स नं.- (०९१)(२२)२६१३२०३९
**E-mail:cehat@vsnl.com**


# आरोग्य साथी उपक्रम व साथी-केंद्र


आरोग्य व आरोग्य सेवा हा जनतेचा हक्क मानला जावा या दिशेने आरोग्य-चळवळीला जनसंघटनांच्या आधारे चालना देणे हे आरोग्य-साथी उपक्रमाचे उद्दिष्ट. जनसंघटनांसोबत काम करणे हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य. आजरा, डहाणू, जव्हार व मध्यप्रदेशात बडवानी भागातील एकूण सुमारे ६० खेड्यांमध्ये स्वावलंबी पध्दतीने आरोग्य साथी काम करत आहेत. दोन-तीन वर्षातच त्यांच्या कामामुळे कष्टकरी, गरीब जनतेचे लाखो रुपये वाचले आहेत. खेडो-पाडी प्राथमिक आरोग्य-सेवा कशी उभी करता येईल याबाबत जनसंघटनांच्या आधारे प्रयोग करणे हा आमच्या कामाचा महत्वाचा भाग आहे. त्यासाठी स्थानिक संघटनेच्या आधारे गावातीलच महिलांना प्रशिक्षण देऊन आरोग्य सेवेतील पहिला दुवा म्हणून उभे करणे, हे आरोग्य साथी उपक्रमाचे एक महत्वाचे ठोस उद्दिष्ट आहे.

आरोग्य जनजागृती मार्फत खाजगी व सरकारी आरोग्य सेवेवर दबाव टाकणे, त्यांच्यातील संवेदनशील व्यक्तींशी सहकार्य करणे व त्यामार्फत आरोग्य सेवांबाबत कष्टकऱ्यांचे काही किमान हक्क प्रस्थापित करणे ह्याही दिशेने डहाणू-जव्हार, आजरा व बडवानी या ठिकाणी या आरोग्य-चळवळीचे काम चालले आहे. आरोग्य चळवळीचे नेतृत्व त्या त्या ठिकाणच्या स्थानिक संघटनेनेच केले आहे. या कामाचे 'आदर्श बेट' न बनता ते सर्वदूर पसरावे अशी या उपक्रमाची धारणा आहे.

आरोग्य व आरोग्य सेवा हे केवळ रोग, औषधे, दवाखाने यांच्याशी संबधित नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या सुखी व सन्मानपूर्वक जीवनासाठीच्या लढ्याचा तो एक भाग आहे. अन्न, पाणी, निवारा, मूलभूत हक्क यासाठीच्या लढ्याबरोबर आरोग्य कार्यक्रम चालवल्याने हा कार्यक्रम स्वावलंबी तत्वावर चालू शकतो हा या प्रकल्पाचा अनुभव. स्थानिक प्रयत्नांना पूरक असे आरोग्य प्रशिक्षण, जनजागृतीचे साहित्य व इतर तांत्रिक सहाय्य देणे ही कामे या प्रकल्पातून ऑक्टोबर १९९८ पासून चालली आहेत. स्थानिक चळवळीचा पाया घट्ट होईल अशी या कामाची बांधणी आहे.

डिसेंबर २००१ पासून हे काम पुढील टप्प्यात शिरले आहे. इतर काही ग्रामीण संघटनांनीही आरोग्य साथी कार्यक्रम घ्यावा यासाठी त्यांच्याशी काही सहकार्य केले जात आहे. महाराष्ट्र व मध्यप्रदेशमध्ये प्राथमिक आरोग्य सेवेत सुधारणा करण्यासाठी जनमताचा दबाव निर्माण करण्यासाठी, राज्य पातळीवर जन-आरोग्य अभियान ही आघाडी उभारली गेली आहे. या आघाडीचा एक क्रियाशील घटक म्हणून साथी-केंद्र डिसेंबर २००१ पासून काम करत आहे.





# आरोग्य साथी

## भाग १

अर्धशिक्षित/निरक्षर कार्यकर्त्यांना आरोग्य-साथी म्हणून प्रशिक्षण देण्यासाठी हे चित्रमय पुस्तक आहे. खेडो-पाडी निवासी प्राथमिक आरोग्य-सेवा मिळायची तर तिथे राहणारे आरोग्य कार्यकर्ते/ आरोग्य-साथी हा त्यातील पहिला दुवा असला तरच ते शक्य आहे. ‘डॉक्टरची गरज नाही’ अशा साध्या आजारांवर सुरूवातीचा उपचार, मर्यादित पण योग्य प्रशिक्षणानंतर ते नीट करू शकतात असा ठिकठिकाणचा अनुभव आहे.  गावात, पाडयातच केव्हाही उपलब्ध असणारी स्वस्त आरोग्य-सेवा, लोकांच्या भाषेत आपुलकीचा आरोग्य सल्ला, आजार टाळण्यासाठी लोकांसोबत गाव सुधारणा इत्यादी कामे करणारे आरोग्य साथी मोठया प्रमाणात तयार होणे ही विशेषतः ग्रामीण भागाची नितांत गरज आहे.  मागास दुर्गम भागात कमी शिकलेल्या/निरक्षर स्त्रियाच या कामासाठी पुढे येतात.  त्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रमाणभूत पुस्तक उपलब्ध नाही.  ही उणीव भरून काढणारे, अनेक वर्षांच्या अनुभवावर आधारलेले हे पुस्तक.

अनावश्यक माहितीचा बोजा कटाक्षाने टाळणे, शास्त्रीय माहिती सोप्यात सोपी करून चित्ररुपाने मांडणे, आरोग्याच्या प्रश्नांकडे जनवादी भूमिकेतून पाहणे ही या पुस्तकाची खास वैशिष्टये. पुस्तकातील पहिल्या भागात आरोग्य, आरोग्यसेवा, आजार व उपचार याबाबतची मूलभूत समज देणारी प्रकरणे आधी आहेत. त्यानंतर जुलाब, पोषण-कुपोषण, जखमेची काळजी व आपली वागणूक हे विषय मांडले आहेत. दुस-या भागात ताप, खोकला, पोटदुखी, रक्तपांढरी व स्त्रियांचे खास आरोग्य-प्रश्न यांची विविध कारणे, त्यांचे निदान, उपचार व प्रतिबंधन याबाबत प्रकरणे आहेत.

मागास दूरस्थ ग्रामीण भागातील कमी शिकलेल्या आरोग्य-साथींनाच नव्हे तर असे काम करणा-या कोणत्याही आरोग्य कार्यकर्त्याला हे पुस्तक मोलाचे ठरेल.



